१९

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,बुलडाणा.

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, बुलडाणा ०७२६२-२४२२०२

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बुलडाणा, कंत्राटी पदभरती -२०१८

## जाहीरात

जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व क्षेत्रीय विविध पदे भरण्यासाठी जाहीरात राज्यात दिनदयाल अंतोदय योजना राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना केली आहे. या अभियानातंर्गत जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व क्षेत्रीय पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिण्याच्या करार तत्वावर भरण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडुन खालील पदांकरीता अर्ज मागविण्यात येत आहे .

### जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील जिल्हास्तरावर भरावयाची पदांची संख्या

| अ.क्र. | पदाचेनाव | मासीक CTC (रु) | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा.अ. | भ.ज.(ब) | भ.ज(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लेखापाल | १५०००/- | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ |
| २ | प्रशासन सहाय्यक | १५०००/- | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ |

### तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील तालुकास्तरावर भरावयाची पदांची संख्या

**१. प्रभाग समन्वयक (एकुण ५० पदे ) मासीक CTC (रु) २०,५००**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ३ | ४ | २ | २ | १ | १ | ० | ९ | २८ | ५० |
| रिक्त जागाचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०२ | ०३ | ०१ | ०१ | ० | १ | ० | ५ | १८ | ३१ |
| अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ | ०२ |
| महिला | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ०३ | ०९ | १७ |

**२. प्रशासन व लेखा सहाय्यक (एकुण १३ पदे ) मासीक CTC (रु) १५,०००**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०२ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०२ | ०६ | १३ |
| रिक्त जागाचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०१ | ०४ | ०९ |
| अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| महिला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०२ | ०४ |

**३. डाटा एन्ट्री ऑपरेटर (एकुण १४ पदे ) मासीक CTC (रु) १०,०००**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०२ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०२ | ०७ | १४ |
| रिक्त जागाचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | १ | १ | ० | ० | ० | १ | ०१ | ०५* | १० |
| अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०२ | ०४ |

**४. शिपाई (एकुण १४ पदे ) मासीक CTC (रु) ८,०००**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०२ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०२ | ०७ | १४ |
| रिक्त जागाचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०१ | ०१ | ०५* | १० |
| अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ०४ |

टिप: १) उपरोक्त क्र.१ ते ४ मध्ये दर्शविलेल्या पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असून सर्व अधिकार अध्यक्ष एम.एस.आर.एल.एम. निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांनी राखुन ठेवले आहे.

२)* दिलेल्या पैकी एक पद हे जिल्हास्तरावरील असून ते जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षात भरण्यात येईल.

वरीलपदासाठी पात्रता निकष, वयोमर्यादा, कामाचे स्वरुप व ऑन लाईन अर्ज व इतर तपशीलासाठी कृपया www.umed.in किंवा www.zpbuldana.gov.in किंवा http://buldanamsrlm.govrecruit.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. तरी इच्छुक उमेदवार दिनांक 22/10/२०१८ ते 10/11/२०१८ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत http://buldanamsrlm.govrecruit.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करु शकतात. अभियानाच्या गरजेनुसार पदसंख्येत, पदस्थापनेच्या ठिकाणात, अटी व शर्तीमध्ये बदल आणि कोणतीही सुचना न देता भरती प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा अभियान संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.तथा
जिल्हा अध्यक्ष निवड समिती,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती
अभियान.बुलडाणा .

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान पदभरती २०१८**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बुलडाणा**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बुलडाणा.०७२६२-२४२२०२**

जा.क्र.एमएसआरएलएम/बुलडाणा/पदभरती /३८८६/२०१८ दि. २८/०८/२०१८

ग्रामीण भागातील दारीद्रय निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या माध्यमातुन गरीबांचे आर्थिक व सामाजीक समावेशन करणे तसेच गरीबांनी ,गरीबांसाठी व गरीबांच्या स्वयंचलित आणि शाश्वत संस्था उभ्या करणे हे या अभियानाचा मुख्य उद्देश आहेत. या उद्देशपुर्तीसाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागा अंतर्गत संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना केलेली आहे. अभियानाच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बुलडाणा व तालुका अभियान कक्ष बुलडाणा, चिखली, देऊळगांव राजा, सिंदखेड राजा, लोणार, मेहकर, मोताळा, मलकापुर, नांदुरा, जळगांव जामोद, संग्रामपुर, खामगांव व शेगांव येथिल खालील पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करार तत्वावर भरावयाची आहेत. उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष बुलडाणा द्वारे खालील प्रमाणे नमुद वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे सरळसेवा स्पर्धा परिक्षा घेऊन भरावयाची आहे. प्रस्तुत पदावरील भरतीसाठी उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. त्या व्यतिरीक्त इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाही.

**परिक्षेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | Online अर्ज सादर करण्याची तारीख व अंतिम तारीख | २२/१०/२०१८ ते १०/११/२०१८ रात्री ११.५५.वा पर्यंत |
| २ | बँकेत Online Payament करण्याची अंतिम तारीख | १०/११/२०१८ रात्री ११.५५.वा पर्यंत |
| ३ | सर्व पदांच्या लेखी परीक्षेसाठी पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | १५/११/२०१८ सायं. ५ वा पर्यंत |
| ४ | परीक्षेचे Online प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | १९/११/२०१८ पसून |
| ५ | लेखी परीक्षा दिनांक | २५/११/२०१८ |
| ६ | उत्तर तालीका प्रसिध्द करणे | २६/११/२०१८ |
| ७ | उत्तर तालिकेवर आक्षेप मागविण्याची वेळ व दिनांक | २७/११/२०१८ ते २९/११/२०१८ |
| ८ | सर्व पदांसाठी लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करणे | ०४/१२/२०१८ |
| ९ | सर्व पदांसाठी लेखी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | ०४/१२/२०१८ |
| १० | प्रभाग समन्वयक पदासाठी मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे (१:५) | ०५/१२/२०१८ |
| ११ | प्रभाग समन्वयक पदासाठी लेखी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करणे | ०६/१२/२०१८ ते ०७/१२/२०१८ |
| १२ | इतर सहाय्यक पदासाठी लेखी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करणे | १०/१२/२०१८ ते ११/१२/२०१८ |
| १३ | मौखीक परीक्षांचे आयोजन (फक्त प्रभाग समन्वयक पदासाठी) | १३/१२/२०१८ ते १४/१२/२०१८ |
| १४ | सर्व पदांची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे. | १५/१२/२०१८ |

उपरोक्त वेळापत्रकामध्ये होणाऱ्या बदलाबाबत संकेतस्थळावर वेळोवेळी खात्री करण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच पात्र उमेदवाराचे अर्जामध्ये नमुद केलेले कागदपत्रे व छाननीच्यावेळी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तफावत असल्यास, सदर उमेदवराला निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

Scanned by CamScanner

१. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हास्तरीय पदांसाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी

| अक्र | पदाचे नांव व मानधन | शैक्षणिक अर्हता | अनुभव (किमान वर्ष ) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | लेखापाल (एकत्रीत मानधन रु.१५,०००प्रतिमाह) पदसंख्या १ | १.मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी/ पदव्युत्तर पदवी, २. एम.एस.सी.आय.टी. किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण आवश्यक ३.Tally ची परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | पदवीचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्षे लेखाविषयक कामाचा अनुभव आवश्यक . |
| २ | प्रशासन सहाय्यक (एकत्रीत मानधन रु.१५,०००प्रतिमाह) पदसंख्या १ | १. कोणत्याही शाखेतील पदवी, २.इंग्रजी टंकलेखन वेग प्रति मि. ४० शब्द, मराठी टंकलेखन वेग प्रति मि.३० शब्द, परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक ३.एम.एस.सी.आय.टी. किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | पदवीचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्षे प्रशासकिय कामाचा अनुभव आवश्यक . |
| ३ | डेटा एन्ट्री ऑपरेटर (एकत्रीत मानधन रु. १०,०००/-प्रतिमाह) एकुण पदसंख्या १ | १. [redacted] माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण २.इंग्रजी टंकलेखन वेग प्रति मि. ४० शब्द, मराठी टंकलेखन वेग प्रति मी. ३० शब्द, शब्द प्रती मिनिट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक ३. एम.एस.सी.आय.टी.. किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्ष डेटा ऐन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालन) कामाचा अनुभव आवश्यक |
| ४ | शिपाई (एकत्रीत मानधनरु.८०००/- प्रतिमाह) एकुण पद संख्या-१ | इयत्ता दहावी (SSC) परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | १० वी ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्ष शासकीय कार्यालय/संस्था/कंपनी मधील कामाचा अनुभव. |

२. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुकास्तरीय पदांसाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी

| अक्र | पदाचे नांव व मानधन | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्रभाग समन्वयक (एकत्रीत मानधन रु.२०,५०० प्रतिमाह) पदसंख्या ५० | १.मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण २. BSW किंवा Bsc Agriculture किंवा MSW किंवा MBA किंवा PG In Rural Development किंवा PG IN Rural Management यापैकी शैक्षणिक अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. | पदवी चे शिक्षण पुर्ण झाल्यानंतरचा किमान ३ वर्ष ग्रामीण भागात गरिबी निर्मुलन व उपजीविका विकास कार्यक्रम, सामाजिक प्रवर्तक व संस्थीय बांधणी विषयक कामाचा अनुभव आवश्यक . |
| २ | प्रशासन व लेखा सहाय्यक (एकत्रीत मानधन रु.१५,०००प्रतिमाह) पदसंख्या १३ | १.वाणिज्य शाखेतील पदवी २. इंग्रजी टंकलेखन वेग प्रति मि. ४० शब्द व मराठी टंकलेखर वेग प्रति मी. ३० शब्द, एम.एस.सी.आय.टी./ किंवा सक्षमं परिक्षा उत्तीर्ण ३. एम.एस.सी.आय.टी./ किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण व Tally ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक | पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्ष प्रशासकीय व लेखाविषयक कामाचा अनुभव आवश्यक . |
| ३ | डेटा एन्ट्री ऑपरेटर (एकत्रीत मानधन रु. १०,०००/-प्रतिमाह) एकुण पदसंख्या १३ | १. [redacted] माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण २.इंग्रजी टंकलेखन वेग प्रति मि. ४० शब्द, मराठी टंकलेखन वेग प्रति मी. ३० शब्द, प्रती मिनिट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक ३. एम.एस.सी.आय.टी.. किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्ष डेटा ऐन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालन) कामाचा अनुभव आवश्यक |
| ४ | शिपाई (एकत्रीत मानधनरु.८०००/- प्रतिमाह) एकुण पद संख्या-१३ | इयत्ता दहावी (SSC) परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | १० वी ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्ष शासकीय कार्यालय/संस्था/कंपनी मधील कामाचा अनुभव. |

३. **वयोमर्यादा :-**

वरील सर्व पदासाठी किमान व कमाल मर्यादा ही दिनांक ०१/१०/२०१८ या तारखेस शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २५.०४.२०१६ नुसार उमेदवारांचे वय व अनुभव परिगणित करण्यात येईल. सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. शारीरीकदृष्टया विकलांग असणाऱ्या उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत असावे.

४. **परीक्षा शुल्क :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी एमएसआरएलएम, मुंबई यांचे पत्र दिनांक ११.७.२०१८ नुसार सदरील भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील

| मागासवर्गीय उमेदवाकरिता | खुल्या प्रवर्गातील उमेदवराकरीता |
|---|---|
| २७४ | ३७४ |

वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील.

Scanned by CamScanner

५. Online पध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

**प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अदयावत करणे :-**

५.१) इच्छुक उमेदवारांनी http://buldanamsrlm.govrecruit.in या संकेतस्थळावर उमेदवार त्यांचा अर्ज Internet सुविधा असलेल्या ठिकाणी भरु शकेल.

५.२) http://buldanamsrlm.govrecruit.in या सांकेत स्थळावर रजिष्ट्रेशन करावे.

५.३) भरती प्रक्रियेच्या दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याने भरती प्रक्रियेच्या संपुर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर इमेल आयडी व मोबाईल क्रमांक वैध/कार्यरत रहाणे आवश्यक आहे.

५.४) वरीलप्रमाणे प्रोफाइल ची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःचा Login ID व passeord व्दारे प्रवेश करुन प्रोफाइल मध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशिल, इतर माहिती, शैक्षणिक आर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशिलाची अचूक नोंद करावी.

| तपशील | Size Limet | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे स्वतःचा अद्यावत फोटो | JPEG FORMAT मधील २० KB पर्यत | लांबी रुंदी प्रमाण ३.५ सेमी x उंची ४.५ सेमी असावे छायाचीत्र समोर चेहरा असावे छायाचीत्राचा ७५ % भाग चेहरा असावा. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील २० KB पर्यत | कोऱ्या पांढऱ्या कागदावर गडद जाड पॉईट च्या पेनने केलेले असावे २.५cm x १.५cm असावे |

५.५) उमेदवाराचे फोटो व स्वाक्षरी, ऑनलाईन अर्ज भरतांना अपलोड करणे आवश्यक आहे. या व्यतीरीक्त इतर कागदपत्रे अपलोड करण्याची गरज नाही.

५.६) त्यानंतर Open होणाऱ्या पेजवरील पदाचे नाव निवडावे व अर्जातील इतर आवश्यक सर्व माहीती भरावी.

५.७) अर्जदाराने अपलोड केलेले Image सुस्पष्ट नसल्यास तो अपात्र ठरविला जाउ शकतो.

५.८) सदर पेज वरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचीत्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर Submitयावर Click करावे.

५.९) अर्जात भरलेली माहिती परिपुर्ण असल्यास येणाऱ्या मेसेज बॉक्स मध्ये भरती प्रक्रियेतील पुढील बाबीसाठी (उदा.अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेश पत्र काढणे. )जन्म तारीख आवश्यक असल्याने ते अचुक असल्याची खात्री करावी अथवा बदल करावयाचा असलयास Edit From यावर क्लीक करुण फार्ममध्ये बदल करा असा संदेश दिसेल

५.१०) अर्जात भरलेली माहीती परिपुर्ण असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहीती अचुक भरल्यानंतर Save & continue या वर क्लीक करावे. त्यानंतर अर्जाची id ऑनलाईन परिक्षा भरण्याची अथवा विहीत केलेले परीक्षा शुल्क जमा करण्याची अंतीम तारीख याबाबतची माहीती उमेदवारास दिसेल

५.११) तयार झालेले From ID भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने तो, उमेदवराने संभाळुन / नोंद करुन ठेवावा या नंतर अर्जात भरलेली माहीती उमेदवारास बदलता येणार नाही.

५.१२) या नंतर उमेदवाराने अर्जात नमुद केलेली सर्व माहिती व तपशील अचुक असून कोणतेही माहीती अथवा खोटा आढळल्यास अर्ज कोणत्याही टप्यात रद्द करण्यात येईल याची जाणीव आहे. असे प्रतिज्ञा पत्र मान्य करुन submit my from यावर click करावे. त्यानंतर अर्ज सादर होईल.

५.१३) http://buldanamsrlm.govrecruit.in या सांकेत स्थळावरील अर्जाची पात्रता या सदरावर क्लीक करावे. त्यानंतरच्या पेजवर पदाची निवड करावी. दिलेली माहीती पुर्ण भरावी.

5.14) पात्र ठरलेल्या अर्जाची भरलेल्या अर्जाची पोच पावती यावर क्लीक करावे. त्यानंतरचा page वर पदाची निवड करुन from id व Date of Birth ही माहिती भरुन प्रिंट रिसीप्ट यावर क्लीक करावे. त्यानंतरच उमेदवाराची पोच पावती तयार होईल.

५.१५) असा e-mail व sms प्राप्त झाल्यावर उमेदवार फॉर्म ची पोच पावती काढुन घेवु शकतो. सदरील from ची पोच पावती प्रींट काढण्याची बाब वैयक्तीक आहे.

Scanned by CamScanner

५.१६) अपात्र ठरलेल्या अर्जाचे बाबतीत आक्षेप असल्यास मदतीचा दुरध्वनी क्र.०७२६२-२४२२०२ यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते ०५:४५ पर्यत संपर्क साधावा अथवा आपली माहीती http://buldanamsrlm.govrecruit.in या ईमेल संपर्कावर कळवावी.
५.१७) लेखी परिक्षा उमेदवराचे कोणतेही कागदपत्र तपासणी न करता घेतली जाणार असल्याने केवळ लेखी परिक्षेस बसु दिल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.
५.१८) अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.
५.१९)प्रवेशपत्र -जाहीरातीतील नमुद पदाकरीता परिक्षा पत्र उमेदवारास http://buldanamsrlm.govrecruit.in आणि www.umed.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर पोस्टाने पाठविले जाणार नाही. परिक्षेच्यावेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचीत्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा.आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र वाहन परवाना )

**५.२० परिक्षा शुल्क भरण्याची पध्दती :-**

Pay Now या लिंकवर क्लिक केल्यानंतर, ऑनलाईन पेमेंटद्वारे परिक्षा शुल्क क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बॅकींगच्या सहाय्याने अदा करता येईल.

६. **परिक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | गुण |
|---|---|---|
| १ | प्रभाग समन्वयक | (८० लेखी व मुलाखत २० असे एकूण १०० गुण) |
| २ | १. लेखापाल<br>२. प्रशासन सहाय्यक<br>३. प्रशासन व लेखा सहाय्यक<br>४. डाटा ऐंन्ट्री ऑपरेटर<br>५. शिपाई | १०० लेखी गुण |

६.१) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. प्रत्येक प्रश्नास एक गुण ठेवण्यात येईल वरीलपैकी **प्रभाग समन्वयक** या पदाकरीता लेखी परीक्षेमध्ये मराठी १४ गुण,इंग्रजी १४ गुण,सामान्य ज्ञान १४ गुण, बौध्दिक चाचणी १४ गुण, सामाजिक शास्त्र १४ गुण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान १० गुण याप्रमाणे ८० गुणाची लेखी परीक्षा व २० गुणाची (मुलाखत) घेऊन गुणवत्तेच्या आधारे निवड केल्या जाईल व मुलाखतीसाठी १:५ या प्रमाणात उमेदवारांना बोलविण्यात येईल.

६.२) १. लेखापाल. २.प्रशासन सहाय्यक ३.प्रशासन व लेखासहाय्यक ४.डाटा ऐंन्ट्री ऑपरेटर ५.शिपाई या पदाकरिता लेखी परिक्षेमध्ये मराठी २० गुण, इंग्रजी २० गुण, सामान्य ज्ञान २० गुण, बौध्दिक चाचणी २० गुण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान २० गुण याप्रमाणे १०० गुणांची लेखी परीक्षा असून गुणाक्रमे उमेदवाराची निवड करण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या राहणार असून प्रत्येक प्रश्नास १ गुण ठेवण्यात येईल.

६.३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१३ जून २०१८ मधील परिच्छेद क्र.९(ब) नुसार ज्या पदाकरीता पदवी कमीत कमी अर्हता आहे. अशा पदाकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी विषयाच्या प्रश्नपत्रीकेचा दर्जा उच्च माध्यमीक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) च्या समान राहील.

६.४) परीक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रनीम /१२१६/(प्र.क्र.६५/१६)१३ अ दिनांक १३ जुन, २०१८ मधील परिच्छेद क्र ११ नुसार निकषावर लावला जाईल.

६.५) शासन परीपत्रक क्रमांक -एसआरव्ही-२०१७/प्रक्र३१/९८/*१६-अ दि.१६मार्च १९९९ तसेच शासन परीपत्रक क्र.एसआरव्ही-२०१२ /प्र.क्र.१६/१२/१६अ दि.१३ ऑगस्ट २०१४ मधील तरतुदीनुसार समांतर आरक्षण कार्यान्वयीत करण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरली जाईल.

Scanned by CamScanner

७. **सर्व पदाकरीता सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

७.१) नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र नजीकच्या काळात काढलेले असावे (विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग करिता आवश्यक) सदर प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१९ च्या आर्थिक वर्षापर्यंत वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसल्यास उमेदवारांचा विचार केला जानार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. जर उमेदवाराने खुल्या प्रवर्गाचे परिक्षा शुल्क भरले असेल तर त्यांचा अर्ज प्रवर्गातील ग्राहय धरण्यात येईल.

७.२) महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक ८२५/२००१/मसेआ००/प्र.क्र.४१५/का-२/दि.२५ मे २००१ मधील तरतुदी नुसार खुल्याप्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासन निर्णयात परीशिष्ठ -३ मध्ये दिलेले प्रवर्गातील उन्नत व्यक्ती / गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदला बदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधुन राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

७.३) सामान्य प्रशासन अधीसुचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००) १२ दि.२८ मार्च २००५ व सामान्य प्रशासन विभाग परीपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्रक्र१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहित नमुण्यातील प्रतीज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.(अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा लागु नाही असे नमुद करुन प्रतीज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)

७.४) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०११ / प्रक्र१०६४/२०११/१६-ब दि.१२ डिसेंबर २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून सहा महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहुन कंत्राटी तत्वावर नियुक्ती दिली जाईल. सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परीपुर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन जात वैधता प्रमाण पत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

७.५) अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात वय, अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निर्दशनास आल्यास, त्यांचे पुर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास, त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्पावर रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निर्दशनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा कारणमीमांसा ऐकुण घेतली जाणार नाही.

७.६) या जाहीरातीत नमुद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परीपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

७.७) उमेदवार हा महाराष्ट्रातील मुळ रहीवासी असावा. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे महाराष्ट्र राज्याचा रहीवाशी असल्याने डोमिसीयल प्रमाणपत्र प्राधीकृत अधिकाऱ्याकडुन घेतलेले असावे डोमिसीयल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७.८) शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधीकाऱ्यांची परवानगी घेउन अर्ज करावा निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाणपत्र तपासणी वेळी सादर करावी लागेल.

७.९) नैसर्गीक आपत्तीमुळे व इतर तांत्रीक कारणास्तव विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर निवड समिती अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा ठरवतील, त्या प्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परिक्षा व मुलाखती
घेण्यात येतील याबाबत www.umed.in व http://buldanamsrlm.govrecruit.in या संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात येईल.

७.१०) सदर जाहिरातीत नमुद रिक्त पदांच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता राहील, त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार पदांची संख्या समांतर आरक्षण यात बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे/बदल करणे इत्यादी सर्व अधिकार हे निवड समिती अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी, अधिकारी जिल्हा परीषद, बुलडाणा यांनी राखून ठेवलेले आहेत. कोणालाही याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

७.११) उमेदवारांनी त्यांचे निवडीबाबत किंवा निवडी नंतर पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास तसेच पद स्थापनेत बदल करणेबाबत विनंती केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

Scanned by CamScanner

(७.१२) वेगवेगळया पदासाठी वेगवेगळे अर्ज सादर करावे लागेल. परंतु एकाच वेळेस वेगवेगळया पदाची परिक्षा आली तर एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.

(७.१३) अनुभव प्रमाणपत्र मोघम नको. अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा / कार्यालयाचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे. संबंधित पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

(७.१४) शासनाने विहीत केलेली शारीरीक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणूक असल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

(७.१५) अनुसुचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय प्रवर्ग या मधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांचे कागदपत्र तपासणीच्या दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

(७.१६) परीक्षेस पात्र / अपात्र उमेदवाराची यादी, लेखी परीक्षेचा निकाल, प्रारुप निवड यादी, अंतीम निवड यादी भरती प्रक्रियेसंबंधीत देण्यात येणाऱ्या सुधारीत व अद्यावत सुचना www.umed.in व http://buldanamsrlm.govrecruit.in या वेबसाईटवर व कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

(७.१७) उमेदवारांना लेखी परीक्षेस कागदपत्र तपासणी व मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

(७.१८) प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील प्रक्रियेत काहीबाबी नमुद करावयाच्या राहील्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमुद केल्या असल्यास त्या प्रचलीत शासन निर्देशानुसार / निर्णयानुसार लागु राहील. जाहिरातीबाबत काही शंका असल्यास त्यांनी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा अभियान सहसंचालक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान बुलडाणा यांना कार्यालयीन वेळेत भेटावे.

(७.१९) परिक्षाच्या दिवशी संवर्गनिहाय उत्तरतालीका जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बुलडाणा या कार्यालयाशी किंवा या कार्यालयाचे ई-ईमेल http://buldanamsrlm.govrecruit.in या सांकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(७.२०) उत्तर तालीका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर आक्षेप असल्यास ३ दिवसाच्या आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती बुलडाणा यांच्या कार्यालयात किंवा या कार्यालयाचे ई-ईमेल http://buldanamsrlm.govrecruit.in या सांकेत स्थळावर सादर करावे उशिरा प्राप्त आक्षेपांचा विचार केला जानार नाही. याची नोंद घ्यावी.

(७.२१) जाहीरातीत नमुद अटीत बदल जाहिरातीच्या काही भागात अंशत: बदल वा संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष उमेद एमएसआरएलएम तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

जिल्हा अभियान व्यवस्थापक,
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,
एमएसआरएलएम, बुलडाणा

प्रकल्प संचालक,जि.ग्रा.वि.यं तथा
जिल्हा अभियान सहसंचालक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती
अभियान, बुलडाणा

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.तथा
जिल्हा अध्यक्ष निवड समिती,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती
अभियान, बुलडाणा .

Scanned by CamScanner